# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 05/12/2022 (सोमवार) सायंकाळ

---

## घरफोडी

पो.स्टे. बुट्टीबोरी :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील विशाल अनाज दुकान ईरा स्कुल जवळ बुटीबोरी येथे दिनांक ०४/१२/२०२२ चे ११.०० वा. ते ०५/१२/२०२२ चे ०५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— मनोज रामकिसन सारडा, वय ४८ वर्ष, रा. सिडको कॉलनी बुटीबोरी याचे स्वत:चे 'विशाल अनाज भंडार' नावाचे किराणा दुकान आहे. व ते स्वत:चे दुकान चालवितात. दि. ०४.१२.२२ रोजी नेहमीप्रमाणे रात्री ०९.३० वा. दुकान बंद केले व घरी गेले. दि. ०५.१२.२२ रोजी सकाळी नेहमीप्रमाणे दुकान उघडले असता दुकानातील काम करणारा मुलगा नामे—रोशन सोनावणे, रा. रुईखैरी हा दुकानातील मागचे शटर उघडण्याकरीता गेला असता त्यास शटरचे लॉक तुटलेले दिसले व शटर वरती उचललेले दिसले. तसेच त्याने येवून फिर्यादीस सांगीतले तेथे मागे जावून पाहिले असता लॉक तोडून शटर वरती केलेले होते. फिर्यादीने दि. ०४.१२.२०२०२२ रोजी रात्री काउंटरचे ड्रॉवर मध्ये १,३५,००० रु. मोजून ठेवलेले होते दि. ०५.१२.२०२२ रोजी चेक केले असता ते मिळून आले नाही. किराणा दुकानातील मागील शटरचे लॉक तोडुन व शटर उघडून आत प्रवेश करुन अज्ञात आरोपीने कांउटरचे ड्रॉव्हर मधील १,३५,०००/— रु. चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बुट्टीबोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर अज्ञात आरोपीचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक साखरकर पोलीस स्टेशन बुटीबोरी मो.क्रं. ७३५०९०२१०० हे करीत आहे.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत मौजा मनसर कांद्री हायवे रामटेक येथे दिनांक ०३/१२/२०२२ चे ०४.०० वा. ते ०४.४५ वा. दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग सा. हे पोलीस स्टेशन रामटेक येथील पोलीस पथक यांचेसह पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन रामटेक पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन बोलेरो पिकअप क्र. एम.एच. ५१ जि. १४०१ क्रमांकाच्या गाडीला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी नामे— धनराज लालचंद रहांगडाले २) मुक्तारशहा मकसुदशहा दोन्ही रा. चांगाटोला जि. बालाघाट म. प्र. यांच्या वाहनाचे मागील डाल्यामध्ये वरखाली कप्पे तयार करून ०५ म्हशी, २ हेले व पिकअप क्र. एम. पी.—५१/जि.—१४०१ असा एकुण किंमती अंदाजे ८,४०,०००/— रूपयाचा मुद्देमाल त्यांच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक अजय किशोर वाघमारे, ब. नं. ४५४ यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे वरील आरोपींविरुध्द कलम कलम 11 (1) (अ), 11 (1) (ड), 11(1) (एफ), 6 प्राण्यांचा छळ अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद

करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक अजय किशोर वाघमारे, ब. नं. ४५४ हे करीत आहे.



**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**